# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

‘शब्दगंध’ 122/अ, प्लॉट नं.3/ब, नृसिंह कॉलनी, गंगाई लॉनच्या पाठीमागे, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर ४१६०१०

**आणि**

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## ताराबाई पार्क, कोल्हापूर

या संस्थातील

# सामंजस्य करार

MEMORANDUM OF UNDERSTANDING

**२२ मे, २०२३**

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2022 ◑ 13AA 306003

17 MAY 2023

दिनाक वि.न. ३३४९३ ला.न.११/९६

श्री. ............ यांनी

रु.( ) या स्टँप मागितलेवरुन रु. /-ची

त्यांचे भरती रु. असे स्टँप दिले.

राहुल ना. पाटील
स्टँप व्हेंडर
तहसिलदार कार्यालय आवार
करवीर, कोल्हापूर.
कोड क्र. २६०१००४

TREASURY OFFICE KOLHAPUR

11 MAY 2023

STAMP HEAD CLERK
TREASURY OFFICE
KOLHAPUR (M S

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

आणि

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर • स्थापना ५ मे २००६ • कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य व भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे, तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे. संघाद्वारे मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते.

विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौद्धिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधांना पारितोषिक, ललित, ललितेतर, संपादित ग्रंथांना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विद्वत्प्रमाणित (Pear Reviewed Research Journal) त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते. त्याचा ISSN No. 2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश केलेला आहे.

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) हे महाविद्यालय शिवाजी विद्यापीठाशी सलग्न असून येथे कला, वाणिज्य व विज्ञान या शाखा आहेत. या महाविद्यालयाद्वारे सातत्याने साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

वर नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आणि विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त) या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. २२ मे, २०२३ रोजी करत आहेत. सदर कराराद्वारे उभय संस्थांच्या सहयोगाने पूर्ण करावयाची खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली आहेत.

**उद्दिष्ट्ये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे, तसेच विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२. चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. मराठी विषयाचे विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम यासाठी सहयोग व सहकार्य करणे.

४. विद्यार्थ्यांसाठी निबंध, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजूषा, कथालेखन, काव्यलेखन, अभिवाचन, पुस्तक परीक्षण, काव्यवाचन, कथाकथन आदी स्पर्धांचे आयोजन करणे.

५. महाविद्यालयातील स्पर्धापरीक्षा मार्गदर्शन केंद्राला मराठी भाषा व साहित्य या विषयाच्या तयारीसाठी सहकार्य करणे.

६. विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकास प्रकल्प, भाषिक कौशल्ये विकास प्रकल्प राबविणे.

७. शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक अधिवेशन प्रतिवर्षी एका वाङ्मयीन विषयांवर आयोजित करणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या व्यावसायिक, शैक्षणिक व अध्यापन विषयांसंदर्भातील समस्यांवर चर्चा करणे आणि उपाययोजना करणे.

८. प्राध्यापक, विद्यार्थी, नवोदित लेखक यांच्यासाठी सर्जनशील लेखन, आयोजित मराठी लेखन या संबंधी प्रकल्प राबविणे.

९. महाविद्यालयात मोडी लिपी, मुद्रित शोधन, पत्रकारिता इ. अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०. प्राध्यापक व विद्यार्थी यांचे ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचा प्रकाशन समारंभ, तसेच ग्रंथचर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबंधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना अवगत करणे. प्रश्न मांडणे व ते सोडवून घेणे.

- **एकमेकांना साहाय्य करण्याची प्रस्तावित कार्यपद्धती (Modus Operandi)**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणांमध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.

३. उपलब्ध साधनसामुग्री नुसार उभय संस्थाद्वारे एक निश्चित योजना तयार करून अंमलबजावणी करणे.

४. शिविम संशोधन पत्रिका त्रैमासिकाद्वारे साहित्यविचार, समीक्षा यांना प्रसिद्धी देणे. विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधन प्रवृत्त करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन वेगवेगळ्या महाविद्यालयात आयोजित करून विचारविनिमय घडवून आणणे.

६. महाराष्ट्र शासन, साहित्य अकादेमी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांचे सौजन्याने विविध उपक्रम राबविणे.

- **अटी**

१. प्रत्येक उपक्रमांसाठी दोन्ही संस्था स्वत:चा खर्च स्वत: उचलतील.

२. या सामंजस्य करारातील उद्दिष्ट्ये व कार्यपद्धती बाबतच्या कलमांचे उल्लघंन होत असल्याचे आढळल्यास हा करार दोहोंपैकी कोणत्याही संस्थेद्वारे कधीही संपुष्टात आणला जावू शकतो. किंवा ६० दिवसांच्या लेखी पूर्व सूचनेने हा करार दोन्हींपैकी कोणत्याही संस्थेला रद्द करता येईल.

३. उपक्रमांसाठी उपस्थित राहणाऱ्या संघांच्या पदाधिकाऱ्यांना किमान प्रवासखर्च द्यावा लागेल.

४. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी ५ वर्षे राहील. परस्पर सहमतीने आणखी ५ वर्षांसाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता उभय संस्थांवर बंधनकारक असेल.

- **समन्वय**

१. सदर कराराच्या पुर्ततेची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, मराठी विभाग प्रमुख आणि समन्वयक काम करतील.

२. सदर सामंजस्य करार उपरोक्त उद्दिष्ट्ये, कार्यपद्धती व अटींच्या अधीन राहून अमलात येत आहेत. त्याचे अभिलेख दोन्ही संस्थाकडे सही शिक्क्यानिशी जतन राहतील.

३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा समन्वयिक अधिकाऱ्यात होत आहे. तो दि. २२ मे, २०२३ पासून पुढील ५ वर्षांसाठी अमलात येत आहे.

| प्रा. (डॉ.) एकनाथ आळवेकर | डॉ. आर. आर. कुंभार | डॉ. रमेश साळुंखे | डॉ. प्रकाश दुकळे |
|---|---|---|---|
| विभागप्रमुख | प्राचार्य | सचिव | अध्यक्ष |

मराठी विभाग प्रमुख
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर